Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P015
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय संस्कृतीत बौध्द ज्ञान परंपरांचे महत्त्व

**अंजूषा रामटेके**
पीएचडी संशोधक
रा तू म ना विद्यापीठ नागपूर
8600596731

**सारांश**

श्रीमद् भागवत मध्ये भारतीय संस्कृतीच्या रहस्य बाबत म्हटले आहे की
वदन्ति यत्तत्वविदस्तत्वं तज्ज्ञानम हयम्।
ब्रम्हेति परमात्मेति भगवानिति शब्धते॥

अर्थात एक अद्वैय ज्ञानात्मक तत्वाला परमात्मा ब्रह्मा किंवा भगवान म्हणतात.त्याच तत्वाला ज्ञानदृष्टीने ब्रह्मा, योगदृष्टीने परमात्मा आणि भक्ती दृष्टीने भगवान म्हणतात. योग कर्मात्मक आहे म्हणून ज्ञान कर्म भक्ती भाव यांचा एकत्र असा महासमन्वय आहे. ब्रह्मा निर्गुण, नि:शक्ती, निराकार आहे. परमात्मा, सगुण, सशक्ति, ज्ञानाकार आहे. तिघांचं हे लक्षण भेद आहे परंतु भाव तत्व एकच आहे. भागवतात जे अद्वैज्ञान उल्लेखित आहे. त्याचे विवरण वज्रयान संपद्रायात अद्वयवज्रसिद्धी नामक ग्रंथात आहे. (बौध्द धम्मदर्शन आचार्य नरेंद्र देव)

वस्तुस्थितीची जाणीव असणे, व्यक्ती आणि परिस्थितीची जाणीव असणे, अनुभव शिक्षण कौशल्य याची समज असणे म्हणजे ज्ञान. आपण कुठे काय करू शकतो याचे भान असणे म्हणजे ज्ञान. ज्ञान म्हणजे प्रज्ञा,ज्ञान म्हणजे बुद्धी, ज्ञान म्हणजे माहिती, ज्ञान म्हणजे अनुभव आणि ज्ञान म्हणजे संस्कृतीतून मिळालेला एक वारसा. भारतात हजारो वर्षापासून खरंतर सिंधू संस्कृती पासून विकसित झालेले ज्ञान प्रणाली समृद्ध परंपरा आहे.ज्यामध्ये तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, वैद्यकशास्त्र, आरोग्यशास्त्र, खगोलशास्त्र, नृत्य, कला, शिल्प आणि बरेच काही. सिंधू संस्कृती पासून तर सम्राट अशोकाच्या शिलालेखापर्यंत जे ज्ञान अवगत आहे त्या ज्ञानाचा उल्लेख वैदिक संस्कृतीत आहे. या ज्ञान प्रणालीचा भारतीय समाजावर नव्हे तर जागतिक विचारावरही लक्षणीय प्रभाव पडला आहे. वैदिक संस्कृती पासून ज्ञान विज्ञानाची भरपूर सामग्री ज्ञानपरंपरे अंतर्गत भारतातील जनमानसातच नव्हे तर विदेशातही पोहोचली गेली. ज्याला आपण " वसुधैव कुटुम्बकम" म्हणतो. यावरून असे दिसून येते की ज्ञान हे एकतेचे प्रतीक आहे. भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व तिच्या समृद्ध आणि व्यापक स्वरूपात आहे. ज्यात संस्कृतीचे जतन, वैज्ञानिक दृष्टिकोनातून समग्र जीवन पद्धती यांचा समावेश होतो. भारतीय ज्ञान प्रणाली द्वारे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले जाते. भारतीय ज्ञान प्रणालीत गुरु शिष्य परंपरा आहे परंतु बौद्ध ज्ञान प्रणालीत आचार्य शिष्य परंपरा आहे. शिक्षा देणाऱ्याला आचार्य किंवा उपाध्याय म्हणतात व शिक्षा घेणाऱ्याला शिष्य म्हणतात. ही परंपरा विनामूल्य कोणतेही दान न स्वीकारता ज्ञानदानाचा कार्य करते. ही एक संघटित प्रणाली आहे. ज्ञान पद्धतशीरपणे एकाकडून दुसऱ्याकडे ज्ञान हस्तांतरण करण्याची परंपरा आहे. भारतीय ज्ञान परंपरेने इतिहास, भूगोल, साहित्यचिकित्सा, सामाजिक मूल्य दर्शन, विज्ञान, कला, संत साहित्यातून जनमानसात पोहोचल्या गेल्या आहे. वेद, उपवेद, अरण्यक, उपनिषद, शास्त्रीय ग्रंथ हे भारतीय ज्ञान व्यवस्थेचा पाया आहे.

**की वर्ड्स :** ज्ञान, परंपरा, संस्कृती, प्रणाली, हस्तंतरण .

**प्रस्तावना**

प्राचीन ज्ञान परंपरा ही वैदिक युगापासून सुरू झाली. त्यात वेद, अरण्यक, उपनिषद आणि शास्त्रीय ग्रंथ होते. वेदांमध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे भारतीय संस्कृतीचा आधार आणि सनातन धर्माची रचना आहे. अरण्यक वाळवंटात राहणाऱ्या तपस्वी साठीच्या विधीचे प्रतीकात्मक स्पष्ट करतात. ऋषी साठी जीवनाच्या वानप्रस्थ टप्प्याच्या कर्मकांडांच्या कर्मकांडात्मक ब्राह्मण आणि उपनिषदांना जोडतात,आत्मिक शुद्धीसाठी प्रयत्न करतात. उपनिषदे प्राचीन संस्कृत तात्विक ग्रंथ आहेत जो वेद्ल शेवटचा भाग आहे. ह्या उपनिषदेवर बौध्द साहित्याचा प्रभाव पडलेला आहे. वेदांत आणि हिंदू धर्माच्या मूळ ज्ञानाचा पाया म्हणून काम करतात. सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी आध्यात्मिक शिक्षणावर भर देतात. ईशा, केना, कथा, मुंडक, मांडुक्य, तैत्तिरिय, ऐतरेय, छांदोग्य, बुहदारण्यक, बृहस्पति, आणि प्रश्न प्रमुख उपनिषद मानली जातात. (उपनिषद विकिपीडिया संस्कृत उपनिषद आयएएसटी.)

भारताने शून्याची खोज करून मोजणीचा अविष्कार संपूर्ण जगाला दिला. आर्यभट्टाने सूर्यशतक, वराहहमीर पंचसिद्धांतिका, ब्रह्मगुप्त ब्रह्म सिद्धांत, भास्कराचार्य खगोलशास्त्र, ज्योतिष्य इत्यादी शास्त्रांचे मोठे योगदान दिले. प्राचीन काळात चिकित्साविज्ञान वैज्ञानिक आधार होता यात चरक संहिता, आयुर्वेद सुश्रूत संहिता, जडीबुट्टी चिकित्सा, वाग्भटाची पशुचिकित्सा, शोध, रसायन विज्ञानात नार्गाजुनाचा शोध विविध धातूंचे रोग निवारण करण्यासाठी उपयोग ही भारताची ज्ञानपरंपरा आहे. शास्त्रीय ग्रंथ यात सामाजिक ज्ञान, खगोलशास्त्र, ज्योतिष्य शास्त्र, वास्तुशास्त्र, गणित, तत्त्वज्ञान, विज्ञान, वैद्य शास्त्र, आरोग्य शास्त्र, नृत्य, कला, शिल्प इत्यादी ग्रंथातून ज्ञानाची परंपरा विकसित झाली. आध्यात्मिक ज्ञानातून शारीरिक मानसिक दोन्ही दृष्टिकोनातून संपूर्ण विकास झाला. वैदिक संस्कृतीत पृथ्वी धातू, आपोधाtu, तेजो धातू, वायु धातू आणि आकाश धातू असे पाच महाधातू सांगितलेले आहेत. तर बौद्ध संस्कृतीत पृथ्वीधातू,आपोधातू, तेजोधातू आणि वायु धातू हे चार महाभूत आहेत. महाभूत म्हणजेच प्रकृती. बौद्ध, जैन, हिन्दु, ख्रिश्चन, इस्लाम, मुस्लिम, पारशी इत्यादी धर्म आहेत. त्यांची परंपरा भिन्न आहे परंतु सर्व धर्मातील परंपरांमध्ये एक समानता आहे. ती म्हणजे सर्व प्रकृतीवर अवलंबून आहेत. भारतीय संस्कृतीत प्रकृतीला पूजनीय स्थान दिले आहे म्हणून बुद्धाने सेल सुत्तात सेल ब्राह्मणाच्या प्रवजिते वेळी सांगितले आहे की यज्ञामध्ये अग्निहोत्र प्रमुख आहे, वेदांमध्ये सावित्री छंदप्रधान आहे, मनुष्यामध्ये राजा प्रधान आहे, नद्यांमध्ये सागर प्रधान आहे,

नक्षत्रांमध्ये चंद्रमा श्रेष्ठ आहे, तापणाऱ्या मध्ये सूर्य श्रेष्ठ आहे, कामना करणाऱ्यांमध्ये पुण्याची कामना करणे श्रेष्ठ आहे आणि सेवा करणाऱ्यांमध्ये संङघाची सेवा श्रेष्ठ आहे. (पेज नंबर 920 मज्झिमनिकाय पाली स्वामी द्वारकादास शास्त्री )

**बुद्ध ज्ञानाचे महत्त्व**

वैदिक युगात जैन धर्म आणि बुद्ध धर्म उदयास आले. जैन धर्मात अहिंसावाद, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य आहे.तर आदिकल्याणं, मज्झिम कल्याणं, परियोसानं कल्याण (अंतही कल्याण )असा दुःखमुक्तीचा मार्ग सांगणारा बौद्ध धर्म. बोधी प्राप्तीनंतर सतत 45 वर्षे चारिका करीत असताना लोकांना फक्त ज्ञान आणि ज्ञान सांगितले. बुद्ध म्हणजे ज्ञान. बुद्धाने सांगितलेला धर्म म्हणजे शील समाधी प्रज्ञा. प्रज्ञा म्हणजे ज्ञान. बुद्धाचे ज्ञान हे त्रिविध देशनेवर आधारित आहे. आज्ञा देशना, व्यवहार देशना आणि परमार्थ देशना. भगवान बुद्धाने सांगितलेला विनय म्हणजे आज्ञा. समाजात वावरण्यासाठी सांगितलेला उपाय आणि कौशल्य म्हणजे व्यवहार देशना. सर्वांच्या कल्याणासाठी सांगितलेलं परमार्थ कुशल म्हणजे परमार्थ देशना. भगवान बुद्धाने जेव्हा बुद्धत्व प्राप्त केले तेव्हा शरीरातील अनुरेणुच्या पूंजकाचा शोध लावला. उत्पत्ती होणे लय होणे वयधम्मा सङ्खारा अप्पमादेन सम्पादेथ असे अंतिम वचन असणाऱ्या भगवान बुद्धाने सांगितले कि, " प्रत्येक घटना घडण्यासाठी काहीतरी कारण असते कारणाशिवाय काहीही होत नाही असा कार्य कारण भाव त्यांनी प्रतित्यसमूत्पादात विश्लेषित केला आहे". पूर्व पूर्व कारण प्रत्ययाने पश्चिम पश्चिम प्रत्यय उत्पन्न धर्माच्या उत्पन्न करणाऱ्या धर्माला प्रतित्यसमुत्पाद म्हणतात. अविद्ये पासून संस्कार, संस्कारापासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामरुपा पासून षड़ायतन, षडायतना पासून स्पर्श, स्पर्शापासून वेदना, वेदनापासून तृष्णा, तृष्णा पासून उपादान, उपादान पासून भव, भवापासून जाती, जातीपासून जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौमनस्य इत्यादी उत्पन्न होते (पेज नंबर 83 विभंग मूलटिका ) त्याच प्रकारे आश्रव नाहिसे झाले तर अविद्या नाहीशी होते,अविद्या नाहीशी झाली तर संस्कार नाहीसे होतात, संस्कार नाहीसे झाले तर विज्ञान नाहीसे होते, विज्ञान नाहीसे झाले तर नामरूप नाहीसे होते, नामरूप नाहीसे झाले तर सळायतन नाहीसे होते, षडायतन नाहीसे झाले तर स्पर्श नाहीसा होतो, स्पर्श नाहीसा झाला तर वेदना नाहीसी होते ,वेदना नाहीसी झाली तर तृष्णा नाहीसी होते,तृष्णा नाहीसी झाली तर उपादान नाहीसे होते, उपादान नाहीसे झाले तर भव नाहीसे होते. भव नाहीसे झाले तर जाती नाहीसी होते, जाती नाहीसी झाली तर जरा, मरण,.सोक, परिदेव, दुःख, दौंमनस्य या सर्वांचा निरोध होतो म्हणजेच निरुद्ध होतात.(पेज नंबर 84 विभंगमूलटीका ) भगवान बुद्धांच्या वचनाने हे स्पष्ट होते की प्रत्येकाच्या होण्याने हे होते याच्या उत्पन्नाने हे उत्पन्न होते हे प्रत्यय नसेल तर ह्याचे निरुद्धाने निरोध होते म्हणजेच उत्पन्नाने उत्पन्न होते व निरुद्धाने निरोध होते.

प्रतित्यसमुत्पादाच्या बारा कड्या

अनुलोम विधी - अविद्या संस्कार विज्ञान नामरूप षडायतन स्पर्श तृष्णा उपादान भव जाती जरा मरण

प्रतिलोमविधी - जरामरण जाती भव उपादान तृष्णा वेदना स्पर्श षडायतन नामरूप विज्ञान संस्कार अविधा ( वंदा मी बोधीवृक्ष पेज नंबर 74 ).

या अनुलोम प्रतिलोम विधीने ज्ञान प्राप्त झाले ते सम्यक सम्बुद्ध म्हणून ओळखू लागले. कोणतेही ज्ञान अवगत करायचे असेल तर रूपाची आवश्यकता असते. रूप स्नायू, हाड, मास आणि त्वचेच्या साह्यायाने बनलेला असते. शरीर नामरूप असे मिळून बनलेले असते. नामामध्ये वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान हे स्कंध असतात. शरीराला ज्ञान अवगत, आकलन करण्यासाठी इंद्रियाची गरज आहे . आपल्या शरीरात सहा ज्ञानेन्द्रिय आहेत. डोळे, कान, नाक,जीभ, त्वचा आणि मन हे सहा इंद्रिय. रूप, शब्द, गंध, रस, स्पर्श आणि धर्म अशा सहा आयतंनाना जाणतात. पुढे डोळ्याचा रूपाशी, कानाचा शब्दाशी, नाकाचा गंधाशी, जिभेचा रसाशी, त्वचेचा स्पर्शाशी आणि मनाचा धर्माशी संबंध जोडला जातो. सहा इंद्रिय, सहा आयतन आणि 18 विज्ञान धातू (चक्षु धातू रुपधातू चक्षुविज्ञान धातू ) ने ज्ञान आकलन करता येते. अभीधम्मपिटकात इंद्रियांची संख्या 22 आहे. इंद्रिय सत्य निर्देशमध्ये 22 इंद्रिय पुढील प्रमाणे आहेत. चक्षुःद्रिय,श्रोतेंद्रिय, घ्राण इंद्रिय,जीव्हा इंद्रिय,काय इंद्रिय,मन इंद्रिय,पुरुष इंद्रिय, स्त्री इंद्रिय, सुख इंद्रिय, दुःख इंद्रिय,सोमनस्य इंद्रिय, दोमनस्येंद्रिय,उपेक्षा इंद्रिय, श्रद्धा इंद्रिय,वीर्य इंद्रिय,स्मृती इंद्रिय,समाधी इंद्रिय, प्रज्ञा इंद्रिय,अनज्ञात ज्ञास्यामिती इंद्रिय, आज्ञा इंद्रिय, अज्ञातावी इंद्रिय ( विशुद्धीमग्ग पेज नंबर143)

भगवान बुद्धांनी सात बोज्झांग सांगितले. बोज्झांग म्हणजे बोधी. बोधी म्हणजे ज्ञान. स्मृतिबोज्झांग,धम्मविचय बोज्झांग, वीर्य बोज्झांग, प्रिती बोज्झांग, प्रश्रब्धि बोज्झांग, समाधी बोज्झांग, उपेक्षा बोज्झांग.

स्मृती - सती, आठवण, स्मरण, जागरूकता, आमिष इत्यादी. स्मृति समोर ठेवून कायकर्म वचीकर्म आणि मनोकर्म संपादन करतो. स्मृती जर जागरूक असेल तर आपल्या हातून अहितकारी गोष्टीचा त्याग होऊन हीतकारी धर्मच ग्रहण होईल. विस्मरण न होणे स्मृतीचे कार्य आहे. आपल्या शरीर आणि मनाने केल्या जाणाऱ्या प्रत्येक कर्माचे स्मरण ठेवणे त्याप्रती जागरूक असणे आणि सजगतेने ज्ञान पूर्वक प्रत्येक कर्म करीत राहणे हे स्मृति प्रस्थान आहे.( अंगूत्तर निकाय वेरज्जक ब्राह्मण सूत्त वि . मू टि. Pg No 241)

37 बोधिपक्षीय अङ्गात चार स्मृती प्रस्ताना मध्ये महत्त्वाचे स्थान दिले आहे म्हणजेच स्मृतीची गणना चार वेळा केली आहे. आर्य अष्टांगीक मार्गात याला सातवे स्थान आहे. सात बोज्झांगा मध्ये स्मृती प्रथम स्थानावर आहे. पाच बला मध्ये स्मृती तिसऱ्या स्थानावर आहे.पाच इंद्रियामध्ये तिसरे इंद्रिय आहे. पाच प्रकारच्या संयमामध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. पाच प्रकारच्या संवरा मध्ये दुसरं संवर आहे. ( विभंग पृष्ठ 18)

**धम्मविचय** - प्रज्ञाद्वारे हित अहित धर्माचे किंवा कुशल अकुशल धर्माचे निवड केल्यास धर्मप्रत्यय कायिक,वाचसिक आणि मानसिक कर्मा प्रति दुःख, अनित्य अनात्म स्वभावाचा विचार करतो. या स्वभावाला समजून स्मृतीबद्ध राहणे म्हणजेच

धम्मविचय होय. सम्मोहविनोदींनी मध्ये' अत्थे यानं अत्त्थपटीसंम्भिदा ' अर्थात ज्ञान अर्थपटीसंम्भिदा. संक्षेप मध्ये धर्मच अर्थ प्रत्यय, प्रभेदाने जो फळ उत्पन्न करणारे हेतू, आर्यमार्ग, कथन ( भासितं ), कुशल, अकुशल हे पाच धर्म प्रतिसंम्भिदा आहेत.
**वीर्य**- उत्साह, उद्योग,पराक्रम, सम्यक व्यायाम किंवा सम्यक प्रयत्न. ज्ञानाच्या प्राप्तीसाठी वीर्य हे सहाय्यक अंङ्ग आहे.
**प्रिती**- मानसिक सुखावेदनेचे नाव प्रिती आहे. प्रिती मनाची अल्हाददायी प्रवृत्तीचे नाव आहे ज्ञान संपादन करण्यासाठी जो उत्साह संपन्न होतो त्यात प्रिती उत्पन्न होते. त्या गोष्टीची आवड असते म्हणून प्रिती उत्पन्न होते.जो धर्म कार्य आणि चित्ताला उत्साहित करून तृप्त करतो.
**प्रश्रब्धि** - शारीरिक आणि मानसिक क्लेशांना शांत करणे. शांत मनात प्रिती उत्पन्न होऊन सुखाची प्राप्ती होते. 'पस्सध कायो सुखं वेदेती' एखाद्या गोष्टीचे ज्ञान अवगत झाले की सुखाची अनुभूती येते.
**समाधी** - "कुसलचित्तस्सेकग्गता हि समाधी" कुशल चित्ताच्या एकाग्रतेला समाधी म्हणतात. ज्ञान प्राप्तीसाठी समाधी सहाय्यक अंङ्ग आहे. सुखाची अनुभूती आली की चित्त समाहित होते. ज्ञान संपादन करण्यासाठी एकाग्रतेची आवश्यकता असते ही एकाग्रता समाधीने पूर्ण होते.
**उपेक्षा** - सुखात्मक दुःखात्मक अनुभूतीने अनुभूतीने न सुखाची वेदना न दुःखाची वेदना यालाच उपेक्षा म्हणतो. ज्ञान प्राप्त करण्यासाठी उपेक्षा हे ज्ञानाचे महत्त्वपूर्ण अंङ्ग आहे. ज्ञान प्राप्त करतेवेळी बाधक येणाऱ्या साधनांचा त्याग करणे म्हणजे उपेक्षा होय. अशाप्रकारे बुद्धाने सात बोधी ज्ञानाचे वर्णन केले आहे.पटीसम्भिदा विभागात चार प्रकारे ज्ञानाचे वर्णन केले आहे.
**अत्थपटिसम्भिदा** ( अर्थसंबंधी ज्ञान ) धम्मपटिसम्भिदा (धर्म संबंधित ज्ञान ) निरुपत्ती (शब्द व्याख्या संबंधी ज्ञान ) पटीभान पटिसम्भिदा (ज्ञान दर्शन संबंधित ज्ञान ) या चारही ज्ञानाचे वर्णन सहा वारात केले आहे. संग्रहवार,सच्चावार, हेतू वार, धम्मवार, प्रतित्यसमुत्पादवार,परियत्तिवार
**संग्रहवर** - चार पटिसम्भिदा ज्ञानाचा सामान्य परिचय
**सच्चावार** - दुःखाचा ज्ञान अर्थप्रतिसम्भिदा, दुःख समुदायाचा ज्ञान धर्मप्रतिसम्भिदा, दुःख निरोधाचं ज्ञान अर्थ प्रतिसम्भिदा, दुःख निरोधगामिनी प्रतिपदा च ज्ञान धर्म प्रतिसंम्भिदा या सर्व धर्माचं व्युत्पत्यात्मक ज्ञान ( व्युत्पत्ती आत्मक ज्ञान. व्यय आणि उत्पत्ती म्हणजे व्युत्पती) निरूपत्ती प्रतिसंम्भिदा आणि ज्ञान दर्शन संबंधित ज्ञान अर्थात पटीभान पट्टी संम्भिदा ज्ञान.
**हेतुवार** - हेतु म्हणजे मूल.चार प्रतिसंम्भिदाचे वर्णन हेतूच्या योगाने केलेले आहे.अर्थ प्रतिसंम्भिदा,हेतू काळाच ज्ञान धर्मप्रती संम्भिदा, धर्माचं व्युत्पत्यात्मक ज्ञान निरुपत्ती प्रतिसंम्भिदा आणि ज्ञान दर्शन संबंधित पटीभान पटीसम्भिदा ज्ञान.
**धम्मवार** - जे धर्म उत्पन्न व प्रादुर्भाव झाले त्याचे ज्ञान अर्थ प्रतिसंम्भिदा,ज्या धर्म कारणाने झाले त्याचे ज्ञान धर्मप्रतिसम्भिदा, धर्माचं व्ययउत्पन्न ज्ञान निरुपत्ती प्रतिसंम्भिदा आणि ज्ञान दर्शन पटिभान पटिसम्भिदा ज्ञान.
**पटिच्चसमुत्पाद वार** - जरा मरण्याचं ज्ञान अर्थ प्रतिसंम्भिदा, जरा मरण निरोध गामिनीच ज्ञान धर्मपटिसम्भिदा, या धर्माचा व्यय उत्पत्ती आत्मक ज्ञान निरुपत्ती प्रतिसंम्भिदा आणि ज्ञान दर्शन पटीभान पटिसम्भिदा ज्ञान.
**परियत्तिवार** - सुत्त, गेय्य, व्याकरण, गाथा, उदान, इतिवृतक्क,जातक,अद्भुत धर्म आणि वेद्ल्ल या नवांङ्ग बुद्ध शासनाचा ज्ञान धर्मप्रती संम्भिदा आहे. या नवाङ्गगाच ज्ञान अर्थ पटिसंम्भिदा ज्ञानात आहे याचं व्युत्पत्यात्मक ज्ञान निरुपत्ती पटिसम्भिदा आहे आणि नवाङ्ग च्या ज्ञान दर्शन संबंधित ज्ञान पटिभान पटि सम्भिदा ज्ञानात सामावले आहे.
भगवान बुद्धाने आपल्या ज्ञान विभंगात एक पासून दहा प्रकारच्या शीर्ष विस्ताराने ज्ञानाचे विवरण स्पष्ट केले आहे ( आणविभंग विभंग मूल टीका pg No131)
1) अहेतूक 2) हेतु विप्रयुक्त 3) सप्रत्यय 4) संस्कृत 5) अरुप 6) लोकीय 7) सास्त्रव 8) संयोजनीय 9) ग्रंथनीय 10) ओघनीय.
एक प्रकारचे ज्ञान - धम्मसंङणी च्या दुक मातीका
दोन प्रकारचे ज्ञान - लोकीय व लोकोत्तर, सास्त्रव प्रज्ञा व अनास्त्रव प्रज्ञा, संयोजनीय प्रज्ञा व असंयोजनीय प्रज्ञा.
तीन प्रकार ज्ञान वस्तूचे निर्देश - श्रुतमयी प्रज्ञा, चिंतन्मयी प्रज्ञा व भावनामयी प्रज्ञा. श्रुतमयी प्रज्ञा -श्रवण आणि पाठांतराने उत्पन्न होते. आपल्या बुद्धीच्या स्तरावर केलेल्या चिंतनाने उत्पन्न होणाऱ्या प्रज्ञाला चिंतन्मयी प्रज्ञा म्हणतात आणि बौद्धिक आधारावर प्रतिष्ठित नसली तरी सदाचाराच्या पालनाने उत्पन्न चित्ताच्या समाधीची गंभीरता कुशल चित्ताने मिळवता येते तिला भावनामयी प्रज्ञा म्हणतात.
चार प्रकारचे ज्ञान - कर्मस्वक ज्ञान**,** सत्या नुलोमिक ज्ञान, मार्गज्ञान, फलज्ञान.
पाच प्रकारचे ज्ञान - पाच अंङ्गाने युक्त समाधीचे ज्ञान.
सहा प्रकारचे ज्ञान - सहा अभिज्ञांचे ज्ञान 1) ऋध्दिविघ ज्ञान 2) श्रोत धातु विशुद्धी 3) परिचित्त विजानन 4) पूर्वे निवासानुस्मृति ज्ञान 5) सत्वाची च्युती 6) उत्पाद ज्ञान आस्त्रवक्षय ज्ञान.
सात प्रकारचे ज्ञान- प्रतित्यसमुत्पादाचे अनुलोम प्रतिलोम चे 77 प्रकारच्या ज्ञान वस्तूचे वर्णन.
आठ प्रकारचे ज्ञान - चार मार्ग ज्ञान आणि चार फलज्ञान.श्रोतापत्ती मग्ग,सकृदागामी मग्ग, अनागामी मग्ग व अर्हत मग्ग. श्रोता पत्ती फल, सकृदागामी फल, अनागामी फल आणि अर्हत फल.
नव प्रकारच्या ज्ञान वस्तू - नव आनुपूर्वविहार समापत्तीचे ज्ञान. चार रुपावचर चार अ रुपावचर आणि एक निरोध समापत्ती.
दहा प्रकारचे ज्ञान - दशबलाचे ज्ञान
1) सत्याला सत्याच्या प्रकारे आणि असत्याला असत्या प्रकारे जाणणे.

2) भूतकाळ भविष्यकाळ आणि वर्तमान काळात केलेल्या कर्माच्या विभागाला विपा काला कारण आणि स्थानासोबत जाणणे.
3) सर्वत्र गामिनी प्रतिपदानुसार सम्यक ज्ञान जाणणे.
4) 31 प्रकारच्या लोकांमध्ये उपलब्ध असलेले विविध धातू चांगल्या प्रकारे ओळखणे.
5) विविध प्रकारे विचार करणाऱ्या माणसांविषयी जाणणे.
6) दुसऱ्या प्राण्यांची इंद्रिय प्रबलता आणि इंद्रिय दुर्बलता व्यवस्थितपणे आकलन करणे.
7) ध्यान, विमोक्ष,समाधी, समापत्ती, संक्लेश,व्यवदान आणि उत्थान सजगतेने जाणणे.
8) पूर्व जन्माच्या गोष्टींना अभ्यासपूर्वक जाणणे.
9) अलौकिक विशुद्ध दिव्यचक्षु नी प्राण्यांची उत्पत्ती होताना आणि प्राण्यांना मरताना किंवा सुगती प्राप्त होतांना बघणे.
10) आश्स्त्रव क्षयाने आश्रव रहित चित्ताच्या विमुक्तीचा प्रज्ञेने साक्षात्कार करणे (134 विभंग अमूल टीका ) अशाप्रकारे बुद्धाने ज्ञानाला संबोधले आहे.या ज्ञानाचे आकलन करण्यासाठी बुद्धाने सहा इंद्रिय सांगितले आहेत.इंद्रियाला अधिपत्य करणारा स्वामी म्हटले आहे.'इन्दाति ति इन्द्रियं 'इंद्रिय ते एक साधनाचं नाव आहे ज्याच्यामुळे आतील बाहेरील स्थित विषयांची सूचना प्राप्त होते.सात इंद्रिय रूप आहेत. जीवित इंद्रिय नाम तथा रूप दोन आहेत. स्त्री इंद्रिय आणि पुरुष इंद्रिय सोडून बाकीच्या 20 इंद्रिय मध्ये 20 इंद्रिय पैकी कोणतेही एक इंद्रिय प्रत्यय धर्म म्हणजे ज्ञान आणि त्यामध्ये संप्रेयुक्त चित्त चैतसिक व त्यामुळे उत्पन्न झालेलं रूप प्रत्येक उत्पन्न धर्म आहेत (41, यमक पठान अट्ठकथा, महेश तिवारी)

**संशोधन पद्धती**- या शोधपत्रका करिता पाली साहित्य का इतिहास,बौद्ध धम्म दर्शन, विशुद्धीमग्ग, बोधी वृक्ष की छाया मे,यमक पठान अट्ठकथा, विभंग, विभंग मूल टीका,मज्झिम निकाय पाली,उपनिषद विकिपीडिया,समीक्षा इन्स्टिट्यूट चे युट्युब लेक्चर. या शोध पत्राशी संबंधित पुस्तकातून तथ्य संकलन केले गेले. या शोध पत्रात प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोत्रातून वर्णनात्मक पद्धती अवलंबिली आहे.

**तार्किक विचार** - भारतीय ज्ञान परंपरेत अनुभवावर आधारित संशोधनात्मक विचारसरणीला आणि तर्काला महत्व दिले जाते जी आज काळाची गरज असून शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची आहे. या ज्ञानपरंपरेत नैतिक आणि आध्यात्मिक शिकवण दिली जाते.आत्म शुद्धी म्हणजे विशुद्धी आणि दुःखमुक्तीसाठी ज्ञानाचे महत्त्व सांगितले आहे थोडक्यात सांगायचे झाले तर भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ भूतकाळातील वारसा नसून ती वर्तमान काळातही जीवन जगण्यासाठी आणि मानवी कल्याणासाठी मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी मानवाने आकलन केल्यास प्रेरणा स्तोत्र आहे.

भारतीय ज्ञान प्रणाली किंवा भारतीय ज्ञान परंपरा विभाग हा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा एक विभाग आहे जो भारतीय ज्ञान प्रणाली प्रणाली ला चालना देतो. ऑक्टोंबर 2020 मध्ये स्थापित AICTE म्हणजेच ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षा परिषदेचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. एवढेच नव्हे तर कोलकत्ता, चेन्नई,कानपूर,मुंबई,चंदीगड, भोपाल आणि बेंगलोर येथे क्षेत्रीय कार्यालय आहेत. ए आय सी टी इ भारतीय ज्ञान प्रणालीतील फाउंडेशन कोर्स शतकांनुशतके विकसित झालेल्या विविध प्राचीन भारतीय ज्ञान प्रणाली चा शोध आणि शिकण्यास प्रोत्साहित करतो. यात वेद, पुराण, उपनिषद, खगोल शास्त्र, आयुर्वेद,योग,गणित, ज्योतिष्य आणि भाषाशास्त्र इत्यादी समाविष्ट आहेत. राष्ट्रीय शिक्षा धोरण 2020- याचा उद्देश आधुनिक शिक्षणात प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेच एकत्रिकरण करणे.NEP 2020 ने भारतीय ज्ञान परंपरेच्या समृद्ध वारसाला मार्गदर्शक आधार म्हणून स्वीकारले आहे. त्याकाळी तक्षशिला विद्यापीठात दहा हजार विदेशी विद्यार्थी विद्या अर्जित करण्यासाठी आले होते तेव्हा त्यांनी आपले भारतीय ज्ञान विदेशात घेऊन गेले. यावेळी आपल्याला हे सांगता आले पाहिजे की आपले भारतीय ज्ञान बाहेरच्या देशात जाऊन वापस आले आहे कारण आपली परंपरा आहे वसुधैव कुटुंम्बकम. भारतीय ज्ञान परंपरा फार समृद्ध आहे या ज्ञानपरंपरेचा वारसा जतन करण्याचं काम आपल्या सर्व भारतीयांचं आहे.

**निष्कर्ष**- भारतीय संस्कृती आणि परंपरा म्हणजे त्याला धर्म, सण,नृत्य,पाककृती आणि कौटुंबिक मूल्य. प्राचीन वैशिष्टपूर्ण अशी भारतीय ज्ञान परंपरा आपल्याला वारसा म्हणून लाभलेली आहे ज्यात वडीलधारांचा आदर सत्कार, सेवाभाव,सुश्रुता आणि सामुदायिक ऐक्य यासारख्या मूल्यांना महत्त्व दिले जाते.जे विविध धर्म आणि प्रदेशानुसार बदलतात. ते म्हणतात ना 'दो कोस पे पाणी और दस कोस पे बानी'. असे असले तरी आजही देशात एकता आणि अखंडता कायम आहे भारतीय ज्ञान परंपरेत गौतम बुद्धांचे मोठे योगदान आहे त्यांनी मानवाला माणुसकी शिकवली मानवाच्या कल्याणासाठी दुःख मुक्तीचा मार्ग सांगितला या दुःखमुक्तीसाठी त्यांनी चार आर्य सत्य आणि आर्य अष्टांगिक मार्गाचे ज्ञान जगाला दिले. ज्ञान हस्तांतरण एक संघटित प्रणाली आहे. जिथे ज्ञान मौखिक, लिखित,हस्तलिखित, छापील आणि शिल्प द्वारे हस्तांतरित केले जाते ज्यामुळे ज्ञानाचा प्रवाह अखंड वाढतो. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ इतिहासातील गोष्ट नाही तर वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी आणि भविष्य काळातील येणाऱ्या पिढ्यांना एक समृद्ध आणि संतुलित जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करणारे एक मौल्यवान वारसा आहे.

**संदर्भ ग्रंथ**


- उपाध्याय, भरतसिंह. पाली साहित्य का इतिहास. हिंदी साहित्य संमेलन प्रयाग, 2008.
- डॉक्टर धम्मकीर्ती. बुद्ध का समाज दर्शन. सम्राट प्रकाशन नागपूर,2008.
- डॉक्टर धम्म कीर्ती. विशुद्धीमग्ग. सम्यक प्रकाशन दिल्ली, 2008.
- शास्त्री, स्वामी द्वारकादास. मज्झिमनिकाय पालि. बौद्ध भारती वाराणसी,1996.
- भदन्त तिस्सवंस. विशुध्दीमग्ग. सुगत प्रकाशन द्वितीय आवृत्ती नागपूर,2010.

- नारायण, ब्रह्मदेव. विभंगमूल टीका. चौखंबा प्रकाशन वाराणसी, 1932.
- तिवारी, महेश. यमक पट्ठान अट्ठकथा.
- बोधी वृक्ष की छाया मे ध्यान संपद्राय.
- पिपलायन, मधुकर. वंदा मी बोधीवृक्ष. सम्यक प्रकाशन दिल्ली,2006.
- आचार्य नरेंद्र देव. बौद्ध धम्मदर्शन.
- उपनिषद विकिपीडिया संस्कृत उपनिषद आयएएसटी.
- समीक्षा इन्स्टिट्यूट चे युट्युब लेक्चर.